New Education Society's

# ARTS, COMMERCE and SCIENCE COLLEGE, LANJA

## National Service Scheme

Late. Kaka Sarfare Smriti S.S.C. (10th) Lecture Series

AND

Education Department, Panchayat Committee, Lanja, Secondary Principals Association, Lanja

Jointly Organized

# 'Environmental Awareness and Tree Plantation Campaign '



## Report

(4 July to 10 July 2022 )

**उपक्रमाचे शीर्षक** - पर्यावरण जनजागृती व वृक्ष लागवड (Title of the activity - Environmental Awareness and Tree Plantation)

**उद्देश -**

1. पर्यावरण रक्षणा विषयी जाणीव जागृती करणे.( To create awareness about environmental protection.)

2. पर्यावरण रक्षणाच्या जबाबदारीची जाणीव करून देणे.( To make aware of the responsibility of environmental protection.)

3. वृक्षारोपण आणि वृक्ष संगोपन करणे.( Plantation and tree care.)

4. भारतीय जातीच्या झाडांचे अधिक प्रमाणावर रोपण करण्यास प्रेरीत करणे.( Encouraging more plantation of trees of Indian variety.)

**कार्यवाही अहवाल -**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लांजाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कै. काकासाहेब सरफरे स्मृती दहावी ( एस.एस.सी.) व्याख्यान समिती, शिक्षण विभाग पंचायत समिती, लांजा, आणि लांजा तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा कार्यक्रमा अंतर्गत पर्यावरण जनजागृती व वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान 4 जुलै ते 10 जुलै 2022 या कालावधीत राबविले गेले.या अभियाना अंतर्गत लांजा तालुक्यातील 24 माध्यमिक विद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जोपासण्याची आवड निर्माण व्हावी म्हणून पर्यावरण जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. यामध्ये वृक्षलागवड,पर्यावरण जागृती आणि प्लास्टिक बंदी वर मार्गदर्शन आणि पर्यावरण शपथ आणि प्रत्यक्ष वड, पिंपळ आणि कडुलिंब या प्रकारची प्रत्येकी पाच वृक्ष शाळेला भेट देणे आणि लागवड करून जोपासना करणेची प्रेरणा देणे असा कार्यक्रम आयोजित केला होता. सोमवार दिनांक 4 जुलै पासून लांजा तालुक्यातील शाळांमध्ये वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम चार-पाच-सहा जुलै रोजी लांजा तालुक्यातील विविध प्रशालांमध्ये आयोजित केला गेला. या कार्यक्रमाचे आणि या शैक्षणिक वर्षाच्या आपल्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमांचे उदघाटन सकाळी साडेनऊ वाजता नक्षत्र गार्डन जवळ वडाचे झाड लावून केले.या वेळी लांजा परिक्षेत्र चे वनाधिकारी मा.आडेकर सो.,संस्थेचे CEO मा. भाऊसो वंजारे, प्राचार्य डॉ.अरविंद कुलकर्णी तसेच मा. दत्ताजी कदम व प्राध्यापक आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक हजर होते .

वृक्ष लागवड करत असताना सध्याच्या कालावधीमध्ये नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या,दीर्घायुषी असणाऱ्या आणि ऑक्सिजनची निर्मिती करणाऱ्या देशी वृक्षांची म्हणजेच वड, पिंपळ, कडूलिंब यासारख्या झाडांची निवड केली होती . प्रत्येक विद्यालयामध्ये ही झाडे नुसती लावायची नाहीत तर त्यासाठी प्रेरणा म्हणून एक पर्यावरण स्पर्धा सुद्धा घोषित केली ज्यामध्ये एक समिती नेमून डिसेंबर आणि मार्च या महिन्यांमध्ये प्रत्येक विद्यालयात जाऊन वृक्ष संगोपन नीट झालेले आहे का नाही ते पाहिले जाणार आहे. वृक्ष संगोपन करीत असताना घेतली गेलेली काळजी आणि विद्यार्थ्यांवर टाकलेली जबाबदारी तसेच वृक्ष लागवडी करीता मुलांना दिलेले प्रोत्साहन इत्यादी बाबींचे देखील निरीक्षण केले जाणार आहे. आणि यामधून योग्य प्रकारे वृक्षांची निगा राखणाऱ्या प्रशालेला आणि विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पर्यावरण रक्षणाची आवड निर्माण

व्हावी, वृक्ष संगोपनाची जबाबदारी त्यांना समजावी,तसेच ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार असणाऱ्या घटकांमध्ये वृक्षतोड किती आणि कसा परिणाम करते याची जाणीव करून देऊन वृक्ष लागवड आणि संगोपनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बिंबवण्याचा प्रयत्न विद्यार्थी संवादाच्या माध्यमातून केला गेला. विद्यार्थ्यांकडून पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. त्यानुसार प्रत्येकी पाच देशी वृक्षांची लागवड करणार असल्याची ग्वाही विद्यार्थ्यांनी दिली.

या कार्यक्रमांमध्ये डॉ. विक्रांत बेर्डे, डॉ. राहुल मराठे, डॉ. राजेंद्र शेवडे यांनी विविध प्रशालेंमध्ये कार्यक्रमा मागची मूळ भूमिका विषद करत पर्यावरण रक्षणामध्ये वृक्षांचे महत्त्व स्पष्ट केले. त्याचबरोबर केंद्र शासनाने एक जुलैपासून सिंगल युज प्लास्टिकला बंदी केलेली आहे या पार्श्वभूमीवर प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम समजावून सांगत डॉ. विक्रांत बेर्डे यांनी प्लास्टिक माणसांच्या रक्तांमध्ये सुद्धा आढळू लागलेले आहे म्हणून त्याची गंभीरता वेळीच ओळखून स्वतःच्या सवयी बदलायला हव्यात आणि प्लास्टिकचा अतिरेकी वापर टाळायला हवा.असे सांगत कापडी पिशवी वापरावर भर दिला पाहिजे असे विचार व्यक्त केले.कार्यक्रमाची विशेष गोष्ट म्हणजे प्रत्येक प्रशालेतील विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडीमध्ये घेतलेला उत्स्फूर्त सहभाग हा होय.

या वृक्षारोपण अभियानाची मूळ संकल्पना जिल्हा परिषद,रत्नागिरी चे माजी बांधकाम सभापती मा.श्री.दत्ताजी कदम साहेब यांची होती. लांजा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावत सोमवार दिनांक 4 जुलै ते गुरुवार दिनांक 10 जुलै पर्यंत लांजा तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालयांमध्ये वृक्षारोपण केले. त्याचबरोबर स्वतः स्वयंसेवकांनी पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिक वापराच्या संदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद देखील साधला. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी शाळेमध्ये सादर केलेल्या प्लास्टिक बंदी वरील पथनाट्या मधून उत्तम प्रकारे जनजागृती केली. यामध्ये 45 स्वयंसेवक आणि 6 प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

सदर अभियान यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती लांजाच्या शिक्षण विभागाचे गट शिक्षण अधिकारी मा.विजय बंडगर साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले तसेच लांजा तालुक्यातील माध्यमिक विद्यालयांच्या मुख्याध्यापकांचे, त्यांच्या सहकारी शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे उत्तम सहकार्य मिळाले त्यांच्या सहकार्याशिवाय हा उपक्रम यशस्वी झाला नसता हे नमूद करावे लागेल.

कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय लांजाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी आणि मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक डॉ.राहुल मराठे यांनी श्री दत्ताजी कदम साहेब यांच्या बरोबरीने उपक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामध्ये डॉ. महादेव बडगे, कार्यक्रम अधिकारी, डॉ.विक्रांत बेर्डे, प्रा प्राची बामणे, डॉ.राजेंद्र शेवडे, प्रा आरती शिंदे यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. के. आर. चव्हाण , संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जयवंत भाऊ शेट्ये, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. भाऊसो वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले.याशिवाय श्री. विवेक सावंत, लांजा तालुका सहकारी कुक्कुट व्यवसाय संस्था मर्यादित, लांजा, वृक्षप्रेमी श्री.उदय सावंत,श्री. संजय तोडकरी तसेच भांबेड येथील कोकम अमृत बहुउद्देशीय कृषी प्रोड्युसर कंपनी लि.लांजा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विशेषत्वाने नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे कै. काका सरफरे यांचे चिरंजीव श्री. सुबोध सरफरे यांनी महत्त्वाची आर्थिक जबाबदारी आणि उपक्रमाची संकल्पना उचलून धरत या उपक्रमाला मूर्त स्वरूप दिले. या सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनीउत्स्फूर्त प्रतिसाद देऊन हे अभियान यशस्वी केले.

## पर्यावरण शपथ

मी अशी शपथ घेतो की, पृथ्वीचे तापमान संतुलित राखण्याकरिता किमान पाच देशी वृक्षांची लागवड करेन. वृक्ष लागवड करणे आणि त्यांचे संगोपन करणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. त्याचबरोबर जैवविविधतेचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य असेल. मी पर्यावरण विनाशाकरिता जबाबदार असणाऱ्या प्लास्टिकचा वापर करणार नाही. मी माझ्या घरातील किंवा परिसरातील केरकचरा इतरत्र टाकणार नाही. तो कचराकुंडीतच टाकेन. सार्वजनिक ठिकाणे समुद्रकिनारे, नदी किनारे, प्रार्थना स्थळे इत्यादी ठिकाणी मी कचरा टाकणार नाही. यांसारख्या पर्यावरण पूरक वागण्याच्या सवयी माझ्या अंगी जोपासेन आणि इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करेन.

जयहिंद !!!!!!

## Environmental Oath

I pledge to plant at least five native trees to balance the Earth's temperature. Planting and tending trees will be my primary responsibility. At the same time, it will be my duty to protect biodiversity. I will not use plastic which is responsible for environmental destruction. I will not dispose of garbage from my house or neighborhood. I will throw it in the trash. I will not litter in public places like beaches, river banks, places of worship etc. I will cultivate such pro-environmental behavior habits in myself and encourage others to do the same.

Jai Hind !!!!!!

डॉ.राहुल मराठे
जिल्हा समन्वयक,
रा.से.यो.विभाग

श्री.दत्ताजी कदम
**माजी बांधकाम सभापती,**
जि.प.रत्नागिरी

डॉ.अरविंद कुलकर्णी
**प्राचार्य**














पर्यावरण जनजागृती व वृक्ष लागवड अभियान
NSS

RESULT -

This activity was implemented in 1 senior college and a total of 24 secondary schools in the taluka. Lectures on environmental awareness - 24, Pathanatya - 01, student dialogue - 6 schools, tree plantation - 150, planting of wad, pimpal, neem trees, environmental oath - 25 places. Beneficiaries – 3000, Duration 8 days, Participating Volunteers – 45, Participating Professors – 06, No. of Beneficiaries: 3000

*************************************************